## निशाणी क्रमांक ११ खालील आदेश
## विजय व इतर वि. मल्हारी व इतर
**(दिनांक ०१.०१.२०२५)**

०१. सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी केला आहे.

०२. प्रतिवादी यांच्यातर्फे कथने आहे की, प्रकरण दि.२६.०८.२०२४ रोजी प्रतिवादींचा लेखी जबाब व से दाखल करण्याकरिता नेमलेले होते. परंतू, मा. शैलेश यु. कंठे साहेब यांचे हृदयविकाराने निधन झाल्यामुळे देऊळगावराजा वकील संघ हा दि. २६.०८.२०२४ रोजी कामकाजापासून अलीप्त होता. त्यामुळे प्रतिवादी हे त्यांचा लेखी जबाब व से मुदतीत दाखल करू शकले नाही. त्यामुळे, प्रतिवादींना त्यांचा लेखी जबाब व से दाखल करण्यास परवानगी मिळणे न्याय व जरूरी आहे.

०३. प्रतिवादीच्या अर्जावर वादीने म्हणणे दाखल करुन सदरच्या अर्जाला विरोध दर्शविला आहे.

०४. अर्ज व अर्जावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. अभिलेखावरील दाखल दस्तऐवज व रोजनामा यांचे अवलोकन केले. प्रतिवादीने त्याच्या अर्जामध्ये नमुद केलेले कारण की, मा. शैलेश यू. कंठे साहेब यांचे हृदयविकाराने निधन झाल्यामुळे देऊळगावराजा वकील संघ हा दि. २६.०८.२०२४ रोजी कामकाजापासून अलीप्त होता हे कारण लेखी जबाब दाखल करण्याच्या विलंबासाठी संयूक्तीक नाही. प्रतिवादी क्र. १ व २ दि.२९.०६.२०२४ रोजी न्यायालयात हजर झाले होते. त्यांनतर त्यांनी दि.२५.०७.२०२४ रोजी लेखी जबाब दाखल करण्यासाठी वेळ मिळण्याचा अर्ज केला. परंतू, तरी देखिल म्हणून वरील नमुद सर्व गोष्टींचा विचार करून व प्रकरण गुणदोषावर निकाली काढण्यासाठी प्रतिवादीच्या अर्जावरील नमुद कारणाला लक्षात घेतले जाते.

०५. तसेच सदरचे प्रकरणामध्ये दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुन व दोन्ही पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन करुन पारीत केलेला आदेश हा जास्त परिणामकारक असेल. त्याच बरोबर नैसर्गिक नियमाप्रमाणे दुसऱ्या बाजुला त्यांची बाजु मांडण्याचा अधिकार देणे गरजेचे आहे. म्हणुन सदरचा अर्ज मान्य करणे हे योग्य राहील. परंतु, प्रतिवादी मुळे प्रकरणात विलंब झाला आहे. हा विलंब प्रतिवादीने खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर भरुन काढता येईल. म्हणुन मी पुढील आदेश पारीत करते.

## आ दे श

०१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. प्रतिवादीने त्यांचा लेखी जबाब अभिलेखावर खर्चाची रक्कम रुपये २००/- (दोनशे रूपये) एकत्रीतपणे वादींना दिल्यानंतर दाखल

करावा.

SHWETA SHIVPRASAD PARIHAR

Digitally signed by SHWETA SHIVPRASAD PARIHAR
Date: 2025.01.03 11:12:39 +0530

दिनांक ०१.०१.२०२५

**(श्वेता एस. परिहार)**
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
देऊळगाव राजा, जि. बुलडाणा.

रूपेश अशोक दांडगे,
लघूलेखक.